15 OCT 2017

तरुण भारत

जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

# 'तरुण भारत'च्या दिवाळी अंकातून वैचारिक मेजवानी

## जि.प.अतिरिक्त मुख्य कार्यकारी अधिकारी इंद्रजित देशमुख यांचे प्रतिपादन : मान्यवरांच्या उपस्थितीत दिवाळी अंकाचे प्रकाशन

प्रतिनिधी

कोल्हापूर :

'तरुण भारत'च्या दिवाळी अंकामध्ये साहित्य, कला, क्रीडा, विज्ञान, राजकारण, समाजकारण अशा विविध विषयांचा समावेश असतो. या क्षेत्रातील दिग्गजांचे अनुभव, चिंतन दिवाळी अंकातून वाचायला मिळते. त्यामुळे प्रकाशाच्या या उत्सवामध्ये 'तरुण भारत'चा दिवाळी अंक वैचारिक मेजवानी ठरतो, असे प्रतिपादन जिल्हा परिषदेचे उपमुख्य कार्यकारी अधिकारी इंद्रजीत देशमुख यांनी केले. त्यांच्या प्रमुख उपस्थितीमध्ये शुक्रवारी कोल्हापूर कार्यालयात दिवाळी अंकाचे प्रकाशन करण्यात आले.

वाचकांची अभिरुची घडवणाऱ्या 'तरुण भारत'चा दिवाळी अंक वैशिष्ट्यपूर्ण असतो. समाजातील चालू घडामोडींबरोबरच मानवी जीवनाच्या सर्व अंगांचा आढावा घेणारे लेख या अंकामध्ये पहायला मिळतात. त्यामुळेच 'तरुण भारत'चा दिवाळी अंक सर्वत्र आवर्जून वाचला जातो. या वर्षीच्या दिवाळी अंकाचे प्रकाशन शुक्रवारी 'तरुण भारत'च्या कार्यालयामध्ये करण्यात आले. यावेळी शिवाजी विद्यापीठाचे प्र-कुलगुरू डॉ.डी.टी.शिर्के, उप कुलसचिव डॉ.व्ही.एन.शिंदे, जनसंपर्क अधिकारी आलोक जत्राटकर हे उपस्थित होते. कार्यक्रमाचे स्वागत व प्रास्ताविक निवासी संपादक जयसिंग पाटील यांनी केले. दिवाळी अंकामधील लेख, कविता, कथा यांची माहिती त्यांनी दिली.

यावेळी डॉ.शिर्के म्हणाले, 'तरुण भारत'च्या दिवाळी अंकालाही विशेष परंपरा आहे. वैशिष्ट्यपूर्ण पुरवण्या, दिवाळी अंक यामुळे स्पर्धेच्या काळातही 'तरुण भारत'ने आपले वेगळेस्थान निर्माण केले आहे. डॉ.शिंदे म्हणाले, दिवाळी हा प्रकाशाचा उत्सव आहे. या सणाच्या निमित्ताने प्रत्येकाच्या जीवनात काही आनंदाचे क्षण येतात. हा आनंद, नवी उमेद निर्माण करणारा असतो. दिवाळी अंकातील लेख, कथा ही नवी उमेद निर्माण करतात.



कोल्हापूर : तरुण भारतच्या दिवाळी अंकाचे प्रकाशनावेळी डावीकडून आलोक जत्राटकर, डॉ. व्ही. एन. शिंदे, डॉ. डी. टी. शिर्के, जयसिंग पाटील, इंद्रजित देशमुख, आनंद साजणे, मंगेश जाधव, संजीव खाडे.

'तरुण भारत'चा दिवाळी अंक अतिशय वाचनीय आहे. त्याची माडणीही वैशिष्ट्यपूर्ण असल्याने तो वाचकांच्या स्मरणात राहणारा आहे. अलोक जत्राटकर यांनी 'तरुण भारत'च्या दिवाळी अंकातील सातत्याने जोपासलेल्या नाविन्यतेवर भाष्य केले. ते म्हणाले, दोन खंडातील दिवाळी अंक, पिशवीतून आलेली दिवाळी अंक, मुखपृष्ठातील वैविध्य अशी प्रयोगशिलता 'तरुण भारत'ने जोपासली आहे. मराठी साहित्यातून अनुभवसंपन्न कथा कमी होत आहेत. 'तरुण भारत'च्या दिवाळी अंकामध्ये मात्र त्या आवर्जून पहावयास मिळतात.

यावेळी इंद्रजीत देशमुख म्हणाले, आपण सगळे रंकाचा राव होण्यासाठी प्रयत्न करतो मात्र गौतम बुद्ध रावाचे रंक झाले आणि त्यांना जीवनाचे अंतिम सत्य उमगले. त्यासाठी माणसाला अंतर्मुख व्हावे लागते. उत्तम साहित्य माणसाला अंतर्मुख करते. त्यामुळे कधीही न सुटणारे व्यसन म्हणजे वाचन. दिवाळी अंक हे वाचण्यासाठी प्रवृत्त करतात. दिवाळीमध्ये लावलेली पणती भोवतीचा अंधार दूर करते याची अनुभूती प्रकाशाच्या या उत्सवात मिळते. 'तरुण भारत'चा दिवाळी अंक या प्रकाशाच्या उत्सवाला वैचारिकतेची जोड देतो. यामध्ये साहित्य, कला, क्रीडा, विज्ञान, राजकारण, समाजकारण अशा विविध विषयांचा समावेश असतो.

यावेळी 'तरुण भारत'चे मुख्य प्रतिनिधी संजीव खाडे, जाहीरात व्यवस्थापक (ग्रामिण) आनंद साजणे, जाहीरात व्यवस्थापक (शहर) मंगेश जाधव आदी उपस्थित होते.

जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर।
15 OCT 2017

सकाळ

## वर्ल्ड फूड डेनिमित्त उद्या चर्चासत्र

कोल्हापूर, ता. १४ : शिवाजी विद्यापीठातील तंत्रज्ञान अधिविभाग व सीआयआय यांच्या संयुक्त विद्यमाने सोमवारी (ता. १६) वर्ल्ड फूड डेच्या निमित्ताने राजर्षी शाहू सभागृहात विशेष चर्चासत्र होत आहे. सकाळी दहा वाजता चर्चासत्रास सुरवात होईल. अधिक माहितीसाठी सीआयआयचे विश्वनाथ पवार किंवा अन्नतंत्रज्ञानचे विभागप्रमुख डॉ. अक्षयकुमार साहू यांच्याशी संपर्क साधावा, असे आवाहन केले आहे.

जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर
15 OCT 2017
पुढारी

# विद्यापीठात 'अन्न प्रक्रिया व्यवसाय' विषयी चर्चासत्र

**कोल्हापूर :** शिवाजी विद्यापीठाच्या डिपार्टमेंट ऑफ टेक्नॉलॉजी (फूड टेक्नॉलॉजी) आणि सीआयआय यांच्या वतीने सोमवारी (दि. १६) सकाळी दहा वाजता 'वर्ल्ड फूड' डे च्या निमित्ताने राजर्षी शाहू सभागृहात विशेष चर्चासत्र आयोजित केले आहे. कार्यक्रमासाठी सीआयआयचे दक्षिण महाराष्ट्र विभागाचे व्यवस्थापकीय संचालक योगेश कुलकर्णी, डॉ. के. यू. मेठेकर, विजयकुमार चोले, पल्लवी कोरगावकर, मनीष अंतवाल, कुलदीप नागलकर, सुमेधा धोंड-जळगावकर, अन्न औषध प्रशासनाचे सहायक आयुक्त मोहन केंबळकर, डॉ. अक्षयकुमार साहू हे मार्गदर्शन करणार आहेत. कार्यक्रमाला प्र-कुलगुरू डॉ. डी. टी. शिर्के, कुलसचिव डॉ.विलास नांदवडेकर तंत्रज्ञान अधिविभागाचे संचालक डॉ. जयदीप बागी उपस्थित राहतील. हा कार्यक्रम सकाळी १० ते सायंकाळी ५ या वेळेत होईल. या कार्यक्रमासाठीची नोंदणी त्याच दिवशी विद्यापीठात केली जाईल. अधिक माहितीसाठी सीआययायचे विश्वनाथ पवार किंवा अन्न तंत्रज्ञानचे विभागप्रमुख डॉ. अक्षयकुमार साहू यांच्याशी संपर्क साधावा.

जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर
15 OCT 2017
महाराष्ट्र टाईम्स

## प्रा. डॉ. लंगरे विभागप्रमुख

**कोल्हापूर :** शिवाजी विद्यापीठाच्या इंग्रजीविभागप्रमुखपदी डॉ. चंद्रकांत लंगरे यांची निवड झाली. डॉ. लंगरे हे मूळचे कोल्हापूर जिल्ह्यातील धरणगुत्ती येथील आहेत. त्यांनी अनेक राष्ट्रीय चर्चासत्रांसह विद्यापीठ अनुदान मंडळाद्वारे पुरस्कृत उजळणी वर्गामध्ये तज्ज्ञ मार्गदर्शक म्हणून काम केले आहे. प्रा. डॉ. लंगरे यांनी अमेरिका, इंग्लंड आणि इटली येथे आयोजित केलेल्या आंतरराष्ट्रीय चर्चासत्रात आपले शोधनिबंध सादर केले आहेत. अमेरिकेतील मॉडर्न लँग्वेज आसोसिएशन यांनी आयोजित केलेल्या सिएटल, वॉशिंगटन (२०१२) आणि जॉन्स हॉपकिन्स युनिव्हर्सिटी, बाल्टीमोर मेरीलँड येथे सबालटर्न लिटरेचर आणि शाम बेनेगल यांच्या चित्रपटांचा भारताच्या राष्ट्रीयत्व बांधणीमधील सहभाग या विषयावर आपले शोधनिबंध सादर केले आहेत.

जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर
15 OCT 2017
सकाळ

# 'कोल्हापुरी चप्पल'चे लेदर पेटंट रजिस्टर



## विद्यार्थी दिग्विजय पाटील याचे संशोधन

कोल्हापूर, ता. १४ : 'देशविदेशांत प्रसिद्ध असलेल्या कोल्हापुरी चप्पलचा दर्जा टिकविण्यासाठी त्याचे पेटंट रजिस्टर केले आहे. चप्पलवर केल्या जाणाऱ्या रासायनिक कोटिंगमुळे ती पावसाळ्यासह सर्व ऋतूंत वापरता येईल. शिवाय विविध रंगांत उपलब्ध होणार आहे. 'कोल्हापूर' नावाने पेटंट मिळू शकत नाही; म्हणून 'सुपरहाड्रोफोबिक लेदर फुटवेअर' अशा नावाने कोल्हापुरी चप्पलचे पेटंट घेतले आहे,' अशी माहिती संशोधक दिग्विजय राजेश पाटील यांनी दिली.

शिवाजी विद्यापीठातील नॅनो सायन्स ॲण्ड टेक्नॉलॉजी विभागात दिग्विजय पाटील हा सध्या बी.एस्सी. २ वर्गात शिकत आहे. गेली दोन वर्षे त्याने कोल्हापुरी चप्पलवर संशोधन केले आहे. त्यातून त्याने टिकाऊ आणि दर्जेदार कोल्हापुरी चप्पलसाठी कोटिंग तयार केले आहे.



दिग्विजय पाटील

दिग्विजय म्हणाला, "लेदरमध्ये कोल्हापूर चप्पल जगप्रसिद्ध आहे. त्याला गालबोट लागू नये, कारण बनावट व खोट्या कोल्हापुरी चपलांची आज बाजारात विक्री होत आहे. चप्पल पावसाळ्यात घातली, तर तिला बुरशी चढते, ती मऊ पडते. नेमके यावरच लक्ष केंद्रित करू, दीड वर्ष अभ्यास केला. त्यानंतर संशोधन केले. त्यानंतर एक रसायन शोधले; ज्यामुळे कोल्हापुरी चप्पलला बुरशी पकडणार नाही. कोणत्याही रंगात ते तयार करता येईल. मूळ रंगालाही रासायनिक कोटिंग करून, आहे तोच रंग ठेवता येतो. भविष्यात इतर चप्पलप्रमाणेच कोल्हापुरी चप्पल मार्केटमध्ये बाराही महिने विक्रीस असेल, ती वापरता येईल. हे संशोधन कोल्हापुरी चप्पलचे आयुष्यमान वाढविणारे आहे. मी स्वतः पावसाळ्यात चिखलात कोटिंग करून चप्पल वापरली आहे. या संशोधनात आई प्रा. डॉ. सौ. ऊर्मिला पाटील, वडील आर. आर. पाटील यांचे मार्गदर्शन मिळाले आहे.

जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर
15 OCT 2017
पुढारी

# कोल्हापुरी चप्पलाचा वापर आता पावसाळ्यातही

## कोडोली येथील विद्यार्थ्याचे संशोधन

**कोल्हापूर : प्रतिनिधी**

कोल्हापुरी चप्पल पावसाळ्यात वापरता येत नाही कारण हे चप्पल भिजल्यास त्यावर बुरशी चढते. पावसाळ्यात चप्पल बनविणाऱ्या कारागिरांच्या व्यवसायात उलाढालही थंड असते. यावर मात करण्यासाठी कोडोली (ता. पन्हाळा) येथील नॅनो सायन्सचे शिक्षण घेणाऱ्या दिग्विजय पाटील या विद्यार्थ्याने संशोधन केले असून केमिकलच्या थराद्वारे या कोल्हापुरी चप्पलाचे पावसाळ्यातही संरक्षण होणार आहे. केमिकल प्रक्रियेनंतर पावसाळ्यात चप्पलाला चिखलसुद्धा चिकटणार नाही, अशी माहिती दिग्विजय पाटील याने पत्रकार परिषदेत दिली.

दिग्विजय पाटील म्हणाला, 'पावसाळ्यात चप्पल वापरल्यास खराब होते. याबाबत गेले दीड वर्षे मी संशोधन करीत होतो. या संशोधनात विविध केमिकलची प्रक्रिया करून पाहिल्या. त्यानंतर एक उपयोगी केमिकल प्रक्रिया समोर आली. सध्या जे संशोधन केले आहे त्याला 'सुपर हायड्रोफोबीक लेदर फुटवेअर' असे नाव देण्यात आले आहे. यासाठी 'बबल थेअरी' स्वत: तयार केली आहे. त्याद्वारे बेस कोट व टॉप कोट असे २ केमिकलचे थर चप्पलावर दिले जाणार आहेत. प्रत्येक चप्पलाला यामुळे १०० रुपयांचा खर्च येणार आहे. हे थर लावल्यामुळे चप्पलावर पाणी, आम्ल, तेल यांचा कोणताही परिणाम होणार नाही. त्याचा टिकाऊपणा वाढणार आहे. याबाबत चप्पल कारागिरांच्या संघटनेशी प्राथमिक चर्चाही केली आहे. तसेच या संशोधनासाठी पेटंट मिळावे यासाठी प्रयत्न सुरू आहेत.

यावेळी प्रा. डॉ. उर्मिला पाटील, आर. आर. पाटील आदींची उपस्थिती होती.